# YUVA RURAL ASSOCIATION

# देणगी करिता आवाहन

प्रती,

मा. श्री/श्रीमती -

सप्रेम नमस्कार!!

माननीय महोदय/महोदया,

आशा आहे की आपण कुशल मंगल आहात. युवा रूरल असोसिएशनचे एक भक्कम समर्थक म्हणून, आपल्यापर्यन्त आवाहन पत्रा मार्फत पोहोचत आहोत. विशिष्ट ध्येय घेऊन आम्ही ज्या समाज घटका साठी कार्य करतो त्या कार्याला चालना मिळावी या साठी हा पत्र व्यवहार.

आजच्या आव्हानात्मक काळात, एक विशिष्ट समाज घटकाला सहानुभूति आणि समर्थनाची गरज अधिक प्रकर्षाने जाणवू लागली आहे. आर्थिक, सांस्कृतिक, आणि सामाजिक अडचणींना तोंड देत असताना पर्यावरणीय बदलांच्या दुष्परिणामामुळे अडचणी वाढतच आहेत. या समस्या व विविध संकटांशी झुंजत असलेले मानवी जग समोर असताना, एकजुटीने उभे राहणे आणि गरजूंना मदतीचा हात पुढे करणे आपल्या सर्वांसाठी अधिकाधिक महत्त्वाचे आवाहन आहे.

प्रतिकूल परिस्थितीचा सामना करणाऱ्या व्यक्ति आणि कुटुंबांच्या जीवनात अर्थपूर्ण बदल घडवून आणण्यासाठी युवा रूरल असोसिएशन वचन बद्ध आहे . आमच्या विविध कार्यक्रम आणि उपक्रमांद्वारे, आम्ही दारिद्र्य, उपजीविका, हवामान बदल, शिक्षण, आरोग्य सेवा, पर्यावरण, जल, जंगल, जमीन संवर्धन, शाश्वत शेती इत्यादि सारख्या महत्त्वाच्या समस्यांचे निराकरण करण्याचा सातत्याने प्रयत्न करीत आहोत. तथापि, हे महत्वाचे कार्य पूर्ण करण्याची आमची क्षमता तुमच्यासारख्या दयाळू आणि दानशूर व्यक्तींच्या समर्थनावर अवलंबून आहे.

आज, मी तुम्हाला सकारात्मक बदल घडवण्याच्या आणि सर्वांसाठी ऊज्वल भविष्य घडवण्याच्या आमच्या प्रयत्नांमध्ये सामील होण्यासाठी निमंत्रित करीत आहे.

तुमचे योगदान, मग ते लहान अथवा मोठे, कितीही असो, ज्यांना सर्वात जास्त गरज आहे त्यांच्या जीवनात आशेचा किरण आणेल आणि निश्चितच त्यांच्या जीवनात आमुलाग्र व मूर्त फरक घडवून त्यांच्या जीवनात आनंद निर्माण करेल. आवश्यक संसाधने उपलब्ध होतील, वंचित मुलांना शैक्षणिक संधि मिळतील, पर्यावरण, जल, जंगल, जमीन संवर्धन प्रकल्पांना मदत होईल.

तुमची देणगी आम्हाला आमचे महत्वपूर्ण कार्य सुरू ठेवण्यास आणि असंख्य व्यक्तींच्या हृदयात आशा निर्माण करण्यास मदत करेल. तुमच्या सहकार्या बद्दल आम्ही आपले सदैव कृतज्ञ राहू आणि त्याचेच प्रतीक म्हणून आम्ही आपल्याला कर सवलतीसाठी 80 G पावती देवू. तसेच वृत्तपत्रद्वारे व समाज माध्यम द्वारे आपल्या योगदानाची माहिती सर्वदुर पोहचवू तसेच आमच्या कार्यक्रमांमध्ये तुम्हाला विशेष अतिथी म्हणून आमंत्रित करू. तथापि, आपल्या मदतीमुळे, औदार्यामुळे वंचितांचे जीवन प्रफुल्लित झालेले पाहून आपल्याला नक्कीच आनंद होईल.

एकत्रितपणे, एकसंध होऊन, आपण वंचितांच्या जीवनात परिवर्तन करूया, समुदायांचे उत्थान करूया आणि एक शाश्वत जग निर्माण करूया.

आमच्या विशेष विनंतीचा विचार आणि आदर करून आणि एका उज्ज्वल भविष्याच्या आमच्या सामायिक ध्यासासाठी आपण सतत समर्पण भावनेने सढळ हस्ते मदत करावी ही विनंती.

धन्यवाद.

आपला कृपाभिलाषी

दत्तात्रय पाटील
मुख्य कार्यकारी अधिकारी

+९१ - ९४२२८ २७९४८
+९१ - ७०८३३२८१५४

info@yraindia.org

www.yraindia.org

/yuvaruralassociationnagpur
/yuvaruralassociation

प्लॉट क्र. १९, दुसरा मजला, न्यू आकाश नगर, संत गजानन हॉल जवळ, मानेवाडा रिंग रोड, नागपूर-३४